20 NOV 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅक मूल्यांकनाच्या 'परिसस्पर्श'साठी समिती

## तज्ज्ञांचा समावेशः तंत्रशास्त्र विद्यापीठासाठी स्वतंत्र समिती

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परामर्श योजनेच्या धर्तीवर राज्यातील नॅक मूल्यांकन झाले नसलेल्या महाविद्यालयांमध्ये नॅक मूल्यांकन होण्यासाठी एप्रिलमध्ये परिसस्पर्श योजना सुरू करण्यात आली. 'परिसस्पर्श' च्या अंमलबजावणीसाठी राज्य, विद्यापीठ आणि जिल्हास्तरीय समितींची रचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निश्चित केली आहे. त्यात तज्ज्ञांचा समावेश आहे.

महाविद्यालयांच्या नॅक अथवा नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन (एनबीए) मूल्यांकनासाठी 'परिसस्पर्श'च्या अंमलबजावणीसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने २ जून रोजी १८ सदस्यांचा समावेश असलेली समिती निश्चित करण्यात आली. त्यात आणखी तीन सदस्यांचा समावेश केल्याचा आदेश या विभागाने १६ नोव्हेंबर रोजी काढला. या तीन सदस्यांमध्ये 'एनबीए'चा एक प्रतिनिधी, वीरमाता जिजामाता तंत्रज्ञान संस्था मुंबईचे प्राध्यापक डॉ. आर. एन. आवळे, शासकीय तंत्रनिकेतन पुणेचे प्राचार्य डॉ. विठ्ठल बांदल यांचा समावेश आहे. लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठस्तरीय आणि विभागस्तरीय समितीची रचना करण्यात आली आहे.

त्यातील विद्यापीठस्तरीय समितीत तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू हे अध्यक्ष, तर सदस्यपदी तंत्रशिक्षणचे सर्व विभागीय सहसंचालक, कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेले शासकीय अथवा अनुदानित संस्थांमधील एनबीए मानांकनासंदर्भातील एक तज्ज्ञ, विनाअनुदानित संस्थांतील एक तज्ज्ञ, 'ए' ग्रेड नॅक मूल्यांकन अथवा एनबीए मूल्यांकन असलेल्या शासकीय अथवा अनुदानित आणि विनाअनुदानित संस्थांमधील प्रत्येक एक आयक्यूएसी समन्वयक, तंत्रशास्त्र विद्यापीठातील आयक्यूएसी संचालक असतील.

### विभागीय समिती

▪ विभागस्तरीय समितीच्या अध्यक्षपदी तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक आहेत. विभागीय सहसंचालकांनी नामनिर्देशित केलेले विभागातील ५० टक्क्यांहून अधिक अभ्यासक्रमांचे एनबीए मानांकन असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य एकूण तीन (त्यापैकी किमान एक प्राचार्य विनाअनुदानित संस्थेमधील असावेत.), शासकीय अथवा अनुदानित आणि विनाअनुदानित संस्थेतील प्रत्येकी एक तज्ज्ञ, अभियांत्रिकी महाविद्यालयातील एक आयक्यूएसी समन्वयक सदस्य राहणार आहेत.

### समिती करणार मार्गदर्शक संस्थांची निवड

▪ या राज्य सल्लागार, विद्यापीठस्तरीय आणि जिल्हास्तरीय समित्या 'परिसस्पर्श'च्या अंमलबजावणी मार्गदर्शक संस्थांची निवड करणार आहेत. या संस्थांचे संचालक, प्राचार्य, विभागप्रमुखांना नॅक, एनबीए मूल्यांकन प्रक्रियेबाबत प्राथमिक प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेच्या माध्यमातून दिले जाणार आहे.

लोकमत

# ‘नॅक’ ‘ए प्लस’चा दर्जा केल्याबद्दल ‘डीकेटीई’चा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात ‘नॅक’ ‘ए प्लस’चा दर्जा मिळाल्याबद्दल ‘डीकेटीई’चा गौरव करण्यात आला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते डीकेटीईच्या प्रभारी संचालिका एल. एस. आडमुठे, डॉ. व्ही. आर. नाईक यांनी पुरस्कार स्वीकारला. डीकेटीईने दोनदा नॅक ए प्लसचे मानांकन मिळवले आहे.

संस्थेच्या यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, आमदार प्रकाश आवाडे, मानद सचिव सपना आवाडे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, ए. एन. जाधव, व्ही. पी. गायकवाड, जी. एस. जोशी उपस्थित होते.

सकाळ

# कमला महाविद्यालयाचे विविध स्पर्धांत यश

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : महापालिकेअंतर्गत घेतलेल्या विविध शालेय स्पर्धेमध्ये कमला महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश मिळवले. कॉलेजच्या खेळाडूंनी स्क्वॅश, बॉक्सिंग, जिम्नॅस्टिक या वैयक्तिक तसेच कबड्डी, खो-खो, नेटबॉल, क्रिकेट या सांघिक क्रीडा स्पर्धेमध्ये यश मिळवले.

स्क्वॅश स्पर्धेसाठी खेळाडूची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. बॉक्सिंगमध्ये अश्विनी पांढरबळे तर जिम्नॅस्टिकसाठी श्रद्धा पाटीलची विभाग स्पर्धेसाठी निवड झाली. दिव्या कोळी, सिमरन लोंढे, शीतल कुंभार, शुभांगी कुंभार, स्नेहल, वैष्णवी यादव व सानिका कांबळे या खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली, तर सांघिक स्पर्धेस अनुष्का पाटील, वैष्णवी नन्नवरे, मानसी वासुदेव (टेनिकॉईट), आदित करे, स्नेहल राणे (खो-खो), अनुष्का पाटील, वैष्णवी नन्नावरे, कीर्ती कंबार (नेटबॉल) उत्कर्षा चौगुले, साईश्री गायकवाड (क्रिकेट) विभागीय स्पर्धेस निवड झाली. खेळाडूंना प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, उपप्राचार्य एम. एन. जाधव यांचे प्रोत्साहन लाभले. कॉलेजच्या शारीरिक शिक्षण संचालक ज्योती लेंगरे, क्रीडा शिक्षक रघु पाटील,अनुजा ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले.